# परळी वैजनाथ नगर परिषद, ता. परळी वैजनाथ जि. बीड

## परळी वैजनाथ नगर परिषद मालकीच्या जागेत डॉ. शामाप्रसाद मुखर्जी उड्डाणापुला शेजारी बांधलेल्या एकुण 54 दुकानापैकी तळमजल्यावरील 27 दुकान गाळे ई-निविदा/ई-लिलाव च्या अटी व शर्ती.

1. परळी वैजनाथ नगर परिषद मालकीच्या जागेत डॉ. शामाप्रसाद मुखर्जी उड्डाणापुला शेजारी बांधलेल्या एकुण 54 दुकानापैकी तळमजल्यावरील 27 दुकान गाळे ई-निविदेद्वारे तीन वर्ष मुदतीकरीता भाडेपट्ट्याने किरायाने) देणेसाठी महाराष्ट्र शासनाच्या http:/mahatenders.gov.in या संकेत स्थळावर, दिनांक 24.04.2026 रोजी दुपारी 06.00 वाजलेपासुन दिनांक 11.05.2026 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यंत पाहता व डाऊनलोड करता येईल. व पात्र ई-निविदा धारक यांना दिनांक 14.05.2026 रोजी सकाळी 11.00 वाजता ते दुपारी 04.00 या वेळेत ई-लिलाव प्रक्रियेत सहभाग नोंदविता येईल

2. ई-निविदा फिस 5000/- रूपये नापरतावा व ई-निविदा अनामत रक्कम रूपये 50000/- परतावा रक्कमेचा भरणा ऑनलाईन बँकिंगद्वारे भरणा करुनच निविदा प्रक्रियेत सहभाग घ्यावा लागेल.

3. नगर परिषदेचे कोणत्याही प्रकारे थकबाकीदार असणाऱ्या व्यक्तींना निविदेत भाग घेता येणार नाही. नगर परिषदेचे बेबाकी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहिल.
4. सदर दुकानगाळे तीन वर्ष कालावधीसाठी किरायाने देण्यात येईल तदनंतर भाडेपट्ट्याचे नुतनीकरन करुन 06 वर्षापर्यंत म्हणजे एकुण 09 वर्षापर्यंत नगर परिषदे आपले गाळे भाडेपट्ट्याने देण्यात यईल.
5. ई-निविदा प्रक्रियेकरीता त्रीसदस्यीय समितीने रू. 20,00,000/- अधिमुल्य निश्चित करण्यात आलेले असुन सदर रकम नापरतावा आहे, तरी सदर निविदेमध्ये रकम भरताना त्रीसदस्यीय समितीने निश्चित केलेल्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कम निविदेमध्ये भरावी लागेल ती रक्कम नापरतावा राहिल. ज्याची निविदेतील रक्कम जास्तीची राहिल त्यास दुकान गाळे किराया करारनामा करून घेवुन तीन वर्षाच्या मुदतीकरीता देण्यात येईल.सदर अधिमुल्याची रक्कम नापरतावा स्वरुपाची असेल म्हणजेच नगर परिषदे अदा केलेली अधिमुल्य नापरतावा रक्कम कोणत्याही परिस्थीत परत केली जाणार नाही.
6. जास्तीची रक्कम भरलेल्या निविदा धारकास निव्वळ मासिक भाडे रूपये 10,413/- प्रतिमाह तीन वर्षाकरीता कायम ठेवुन विहित मुदतीत नगर परिषदेत भरणा करणे बंधनकारक राहिल. आणि गाळेधारकाला सदर गाळ्याच्या ठिकाणी कोणतेही कायम स्वरूपाचे बांधकाम करण्याची परवानगी नाही तसेच सदर गाळ्याची मुदत ही जास्तीत जास्त नऊ वर्षाकरीता असुन दर एक वर्षानंतर दुकान भाडेवाढ करण्यात येईल व ते गाळेधारकास मान्य असेल.

7. मुदत संपल्यानंतर नियमाप्रमाणे मुदत वाढ द्यावयाची झाल्यास सुधारीत दुकान भाडे (किराया) करारनामा करून द्यावा लागेल.
8. ई-निविदेत भाग घेवुन जास्तीची रक्कम भरून दुकान गाळे किरायाने घेणाऱ्यास रू. 500/- च्या मुद्रांकावर किराया करारनामा करून द्यावा लागेल.
9. ज्या यशस्वी निविदा धारकाने ई-लिलाव मध्ये जास्तीची रक्कम सादर केलेली आहे त्यांनी अंतिम ई-लिलावात भरल्याची रक्कम जी असेल त्याच्या 50% रक्कम निविदा मंजुरी ई-लिलाव झालेल्या दिनांकाच्या दहा दिवसाच्या आत भरणा करावी व उर्वरीत 50% रक्कम व एक वर्षाचे निश्चित भाड्याची रक्कम आगाऊ  निविदा मंजुरी दिनांकाच्या तीस दिवसाच्या आत भरणा करणे बंधनकारक राहिल, 100% रक्कम भरल्याशिवाय दुकान ताब्यात देणार नाहित.
10. ज्या यशस्वी ई-लिलाव धारकाने निविदेत जास्तीची रक्कम सादर करून ई-लिलावात भरलेली आहे त्यांनी अंतिम निविदेत भरल्याची रक्कम जी असेल त्याच्या 50% रक्कम निविदा मंजुरी दिनांकाच्या दहा दिवसाच्या व उर्वरीत 50% कमी रक्कम निविदा मंजुरी दिनांकाच्या आत भरणा न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदर गाळ्याची निविदा पुनःश्च प्रसिध्द करण्यात येईल.
11. दुकान गाळ्याचे काही नुकसान अथवा पडझड झाल्यास त्याचे मुल्यांकन नगर अभियंता यांच्याकडुन करून त्याबाबतची नुकसान भरपाई गाळेधारक यांच्या कडुन वसुल करण्यात येईल.
12. दुकान गाळे मध्ये विद्‌युत मिटर स्वतः गाळेधारक यांनी घेणे व त्याचे विद्‌युत देयक (लाईट बील) गाळेधारकाने मुदतीमध्ये भरणे बंधनकारक राहिल.
13. दुकान गाळ्यांच्या ई-निविदा/ई-लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेवुन दुकान गाळे किरायाने घेणाऱ्याचे किराया करारनामा रद्द करून दुकान गाळे नोटीस देवुन नगर परिषदेच्या ताब्यात घेण्याचा अधिकार नगर परिषदेने राखुन ठेवलेला आहे.
14. शासन नियमाप्रमाणे एस.सी. व एस.टी. (SC व ST) प्रवर्गाकरीता **दोन** दुकान गाळे ज्याचा क्र. 26, 27 राखीव ठेवण्यात आले आहेत.
15. अपंगाकरीता शासन नियमा प्रमाणे **एक** दुकान गाळा क्र. 25 राखीव ठेवण्यात आलेला आहे.

बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना व लोकसेवा केंद्रांना शासन नियमा प्रमाणे **तीन** दुकान गाळा क्र. 19, 20, 21 राखीव ठेवण्यात आलेला आहे.

16. मराठी भाषा साहित्यीक करीता  शासन नियमा प्रमाणे **एक** दुकान गाळा क्र. 13 राखीव ठेवण्यात आलेला
 आहे
17. दुकान गाळ्यामध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना ठेवण्याची जवाबदारी किरायादारवर राहिल.

19. दुकान गाळे किरायसदारावर म.न.पा. अधिनियम 1965, MRTP ACT 1966 मालमत्ता हस्तांतर नियम व अनुषंगीक सर्व शासन निर्णय बंधनकारक राहतील.
20. दुकान गाळ्याचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी किरायदार यांच्यावर राहिल.
21. सदर दुकान गाळ्यामध्ये मांस व मद्य विक्री व्यवसाय करता येणार नाही.
22. सदर किरायदार यांनी जागेचा वापर स्वतः करावा इतर कोणासही सदर दुकान वापरण्यास अगर पगडीने देवु नये/ पोट भाडेकरू ठेवु नये, तसे आढळुन आल्यास नगर परिषदेला जागा खाली करून घेण्याचा अधिकार राहिल.
23. नगर परिषदेने वापरासाठी दिलेले दुकान/जागा अहस्तातरणीय असुन इतर दुसऱ्या व्यक्तीस ती जागा हस्तांतर करण्यात येणार नाही.
24. नगर परिषदेस कोणत्याही कारणासाठी जागेची गरज भासल्यास कोणत्याही क्षणी बीनशर्त सदर जागा ताब्यात घेण्याचा अधिकार परिषदेने राखुन ठेवला आहे.
25. सदर दुकान गाळ्यांना क्रमांक दिलेले असुन त्याची पाहणी व खात्री करून निविदा भरावी. उपरोक्त अटी शर्तीचा भंग झाल्यास सदर दुकान गाळे न.प.च्या ताब्यात घेण्यात येतील.
26. उपरोक्त अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.

## ई-निविदा करीता लागणारी तांत्रिक कागदपत्रे

1. कोरी निविदा फि दरपत्रक व ई-निविदा अनामत रकमेचा ऑनलाईन भरणा केल्याची पावती.
2. नोंदणी प्रमाणपत्र (शॉप ॲक्ट).
3. मागसवर्गीयांसाठी राखीव दुकान गाळ्याकरीता एस.सी. व एस.टी. (SC व ST) प्रवर्गाचे सक्षम प्राधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र.
4. अपंगाकरीता राखीव गाळ्यांसाठी सक्षम प्राधिका-याचे अपंगात्वाचे प्रमाणपत्र.
5. मराठी साहित्य विक्री प्रकाशक यांचे नोंदणी प्रमाण पत्र.
6. बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना व लोकसेवा केंद्रांचे प्रमाणपत्र.
7. नगर परिषदेचे बे-बाकी प्रमाणपत्र.

स्वाक्षरीत

**मुख्याधिकारी**

**नगर परिषद परळी वैजनाथ**

Signature Not Verified

Digitally signed by Popat Nanasaheb Nigal
Date: 2026.04.24 16:35:17 IST
Location: Maharashtra-MH